Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021)
with CGPA 3.52

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शैक्षणिक वर्ष २०२४–२५
शिवाजी विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमानुसार

### बी. ए. भाग–१, (सत्र–२)

### क्रमिक पुस्तक : संस्कृत

# संस्कृत दृश्यकाव्याचा परिचय

– लेखक व संपादक –

**प्रा. (डॉ.) श्रीमती मृणालिनी आबासाहेब शिंदे**
संस्कृत विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

– लेखक –

*** प्रा. रुपाली रघुनाथ वाडेकर**
विलिंग्डन महाविद्यालय,
सांगली

*** डॉ. कावेरी नारायणराव जाधव**
सावित्रीबाई फुले
पुणे विद्यापीठ, पुणे

घटक क्रमांक-४

# उत्तररामचरितम् ।
# (अंक दुसरा- स्थूल अध्ययन)

**१. प्रस्तावना -**

घटक क्रमांक १, २ व ३मध्ये आपण संस्कृत नाटकाचा उद्गम आणि विकास तसेच नाट्यसंज्ञांचा परिचय आणि भवभूतीच्या उत्तररामचरितम् या नाटकाच्या प्रथम अंकाचा अभ्यास केला आहे. प्रस्तुत घटकात आपण उत्तररामचरितम् या नाटकातील द्वितीय अंक- पंचवटीप्रवेश आणि तृतीय छाया-अंक याचे स्थूल अध्ययन करणार आहोत.

पहिल्या अंकात रामाच्या राज्याभिषेकानंतर सारे आप्तस्नेही, अतिथी आपापल्या घरी परतल्यावर, विशेषतः सीतेचे वडील विदेहदेशाचा राजा जनक परतल्यावर आणि वसिष्ठ ऋषी आपली पत्नी अरूंधतींसह तिन्ही राजमाता (कैकेयी, कौसल्या, सुमित्रा) ऋष्यशृंगांकडे यज्ञासाठी गेल्यावर एकाकीपण अनुभवणाऱ्या राम सीतेचे मन रिझवण्यासाठी लक्ष्मणाने आणलेल्या चित्रपटदर्शनाने वनवासातील कटुगोड स्मृतीमध्ये राम-सीता दोघेही हरवून गेले असता ऋष्यशृंगांकडून अष्टावक्र नामक दूत वसिष्ठादिकांचे त्यांच्यासाठीचे निरोप व आशीर्वाद घेऊन येतो व सीतेच्या डोहाळेपूर्तीकडे रामाने आवर्जून लक्ष दिले पाहिजे व लोकानुरंजन हे सर्वोच्च ध्येय मानून, बाकी साऱ्या गोष्टी केल्या पाहिजेत, असे दोन महत्त्वपूर्ण निरोप रामाला मिळतात. रामाकडे नुकतीच सीतेने पुन्हा एकदा रामासह वनात जाण्याची इच्छा होत असल्याचे बोलून दाखविलेले असते. त्यामुळे तोच तिचा डोहाळा मानून तो अग्रक्रमाने पुरवण्याची आज्ञा राम लक्ष्मणाला देतो व प्रजानुरंजन हे सर्वस्व असल्यामुळे त्यासाठी प्राणच काय, प्राणाहून प्रिय अशा जानकीचाही त्याग करेन, असे भावनेच्या भरात बोलून जातो. तेवढ्यात प्रजेचे मनोगत जाणून घेण्यासाठी गेलेला दुर्मुख नावाचा गुप्तहेर येऊन सीतेविषयी लोकांत वेगाने पसरत जाणारा गैरसमज रामाच्या कानावर घालतो आणि त्यामुळे अस्वस्थ झालेला राम तातडीने सीतात्यागाचा निर्णय घेतो. तो निर्णय घेताना त्याच्या मनाला खूप यातना होतात. पण तरीही 'राजधर्म' म्हणून तो सीतेला वनात नेऊन सोडण्याची आज्ञा लक्ष्मणाला देतो. मधल्या या नाट्यमय घटनेची जराही कल्पना